# <u>नियमीत फौजदारी खटला क्र.४२/२०१४ मधील निशाणी क्र.५६ वरील आदेश</u>

## (विकास नारायण मराठे विरुध्द अंजली विकास मराठे आणि इतर २)

१. आरोपी यांनी सदरचा अर्ज प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी मयत झाल्यामुळे सदरची फिर्याद फेटाळण्याबाबत दाखल केला आहे.

२. आरोपी यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सदर खटल्यातील फिर्यादी विकास नारायण मराठे हे दिनांक २२/०१/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. फिर्यादी मयत झाल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे फिर्यादी मयत झाल्यामुळे सदरची फिर्याद संपुष्टात आलेली आहे व इतर कोणासही सदरची फिर्याद चालविण्याचा अधिकार नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी निशाणी क्र.५६ येथे सदर अर्जास म्हणणे व युक्तीवाद दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ही फिर्यादीची पहिली पत्नी आहे, तर अर्जदार क्र.२ व ३ ही फिर्यादीचा मुलगा व मुलगी आहे. सदर खटल्यामधील आरोपी क्र.१ ही फिर्यादीची दुसरी पत्नी असुन आरोपी क्र.२ मुलगी व आरोपी क्र.३ मेव्हणा असे आहेत. फिर्यादी हे दिनांक २२/०१/२०१८ रोजी दिर्घ आजाराने मयत झाले. फिर्यादीने दाखल केलेल्या युक्तीवादामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचा एक न्यायनिवाडा दाखल केला आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये देखील असे नमुद केले आहे की, जरी फिर्यादी मयत झाला, तरी खटला संपुष्टात येत नाही. सदर खटला गुणवत्तेवर चालणे व फिर्यादीतर्फे वारसांचा पुरावा येणे आवश्यक असुन त्याप्रमाणे सदर खटल्याची कार्यवाही पुढे चालणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा

युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, फिर्यादीतर्फे वारसांनी फिर्यादी विकास नारायण मराठे यांचा मृत्युचा दाखल्याची प्रमाणित प्रत, अर्जदार हे फिर्यादीचे वारस असल्याबाबतचा कुडाळ पोलीस पाटील यांनी दिलेल्या दाखल्याची प्रमाणित प्रत, अर्जदार हे फिर्यादीचे वारस असल्याबाबतचा कुडाळ नगरपंचायतीने दिलेल्या वारस दाखल्याची प्रमाणित प्रत, अर्जदार देवेंद्र विकास मराठे व हेमंत विकास मराठे यांच्या जन्माच्या दाखल्यांच्या प्रमाणित प्रती, फिर्यादी विकास नारायण मराठे यांच्या रेशनकार्डची प्रमाणित प्रत व अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रती इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

६. अर्जदारतर्फे वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***चॉद देवी दागा विरुध्द मंजु हुमातानी एलईएक्स एस.सी. २०१७, ११४*** या न्यायनिवाडयाची प्रत दाखल केली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर न्यायनिवाडयामध्ये असे गुणोत्तर स्पष्टपणे नमुद केले आहे की, जरी एखाद्या केसमध्ये फिर्यादी मयत झाला, तरी केस संपुष्टात येत नाही. तसेच प्रस्तुत खटल्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, फिर्यादी यांनी सदरचा खटला, आरोपी यांनी फिर्यादीच्या खोटया सहया करुन बोगस कुळअखत्यारपत्र बनवुन फिर्यादी आजारी असल्याचा गैरफायदा घेऊन सदर बोगस कुळअखत्यारपत्राने मौजे शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकती इतर आरोपींना विकलेल्या आहेत, याकरिता दाखल केला आहे. त्यामुळे सदर खटल्यातील गुन्हयाचे स्वरुप पाहता खटल्याचे कामकाज गुणदोषावर चालणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर खटल्यातील फिर्यादी मयत झाल्यामुळे त्याच्या वारसांना अभिलेखावर समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत कामी खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | फिर्यादीतर्फे वारसांनी पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर समाविष्ट करुन घ्यावे असे फिर्यादीतर्फे वारसांना निर्देशित करण्यात येते. |
| २. | आरोपीचा अर्ज (निशाणी क्र.५६) नामंजूर करण्यात येत आहे. |

सही/-
(सुजाता रा. शिंदे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कर्जत.
जि. रायगड

ठिकाण - कर्जत
दिनांक: १६/१२/२०२३